“नांदेड जिल्ह्यातील इतर मागासवर्गीय समाजाच्या आर्थिक विकासातील आरक्षणाची भूमिका (2011ते 2021)”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्य विज्ञान विद्याशाखे अंतर्गत ‘अर्थशास्त्र’ या विषयातील पीएच्.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करण्यात आलेला शोधप्रबंधाचा प्राथमिक आराखडा

संशोधक

सोनकांबळे जुही धोंडीबा

एम.ए.(अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.मोहोकार हरीहर शिवदास

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको,

नवीन नांदेड

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकुल,

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

सप्टेंबर 2023

“नांदेड जिल्ह्यातील इतर मागासवर्गीय समाजाच्या आर्थिक विकासातील आरक्षणाची भूमिका (2011ते 2021)”

1.1 प्रस्तावना :

“नांदेड जिल्ह्यातील इतर मागासवर्गीय समाजाच्या आर्थिक विकासातील आरक्षणाची भूमिका (2011 ते 2021)” हा विषय संशोधन करण्यासाठी घेतला आहे. अर्थशास्त्र अभ्यासात आर्थिक व्यवस्था आणि आर्थिक क्रियांचा प्रामुख्याने अभ्यास केला जातो. विशेषत: एखाद्या समाजाची आर्थिक स्थिती जाणून घेण्यासाठी आरक्षणाची भूमिका काय आहे? याचा आढावा प्रस्तुत अध्ययनात घेण्यात येणार आहे. काही समाज आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहेत. त्यांच्याकडे उत्पादनाची साधने पुरेशा प्रमाणात नाहीत. शेती व उद्योग व्यवसाय नाही अशा समाजाकरीता आरक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे. समाजाचे अथवा समाजातील विविध घटकांचे कल्याण साध्य करणे हे फायदे मिळविणे म्हणजेच समाज आणि व्यक्तीचा विकास साध्य करणे होय. एखाद्या समाज सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेला कसा आहे. परिणामी आरक्षणाचे लाभ घेण्यास तो कसा पात्र ठरतो या दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात येणार आहे. एखाद्या समाजाला आरक्षण कसे द्यावे, आरक्षण कोणत्या निकषात द्यावे हे देखील महत्त्वाचे आहे. राखीव जागांचे धोरण हा स्वातंत्र्यपूर्व काळातच उदयास आलेली संकल्पना आहे. ब्रिटिशांनी सामाजिक व राजकीय न्यायाचे तत्त्व म्हणून 20 व्या शतकाच्या विधीमंडळात अल्पसंख्याक समाजासाठी काही जागा राखून ठेवल्या

होत्या. या संदर्भात महात्मा फुलेंनी हंटर कमिशन समोर साक्ष देताना विशेष संधीचा सिद्धांत मांडला होता. म्हणजेच एखाद्या समाज घटकाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आरक्षण किती महत्त्वाचे आहे हे लक्षात घेतले पाहिजे. तात्पर्य, आरक्षणाचा विषय हा मागासवर्ग असून जो समाज शिक्षण, प्रशासकीय सेवा व राजकीय निर्णय प्रक्रियेपासून वंचित आहे त्यास आरक्षण देऊन मुख्य प्रवाहात आणले पाहिजे.

आरक्षणास संविधानाच्या चौकटीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महत्त्व दिले आहे. आरक्षणास कायद्याचे स्वरूप भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून डॉ.आंबेडकरांनी प्राप्त करून दिले आहे. म्हणून आरक्षणास महत्त्व प्राप्त झाले. भारतीय राज्यघटनेचा भाग तीन आणि चार मध्ये आर्थिकदृष्ट्या कमकुवत समाजाचा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासाकरीता मूलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्त्वे सांगितले आहेत. तसेच भारतीय राज्यघटनेच्या विविध कलमांमध्ये मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणासंदर्भात चर्चा केली आहे.

1.2 आरक्षणाची संकल्पना :

भारतात आरक्षणाची संकल्पना ब्रिटिशकाळात महात्मा ज्योतिबा फुले यांनी मांडली. महात्मा फुलेंनी ‘गुलामगिरी’ या त्यांच्या पुस्तकामध्ये जातीवर आधारीत आरक्षणाची पहिल्या प्रथम मागणी केली. कालांतराने छत्रपती शाहू महाराजाने देखील आरक्षणासंदर्भात मागणी केली. 26 जुलै 1902 रोजी आरक्षण धोरणाची घोषणा केली. 50% राखीव जागा उच्चवर्णीयांना आणि 50% राखीव जागा इतर

जातीकरीता राखीव ठेवल्या. शाहू महाराजांनी व्यापक दृष्टिकोनातून बहुजन समाजाला आरक्षण लागू केले. शाहू महाराजांच्या आरक्षण धोरणास प्रत्यक्ष राज्यघटनेत स्थान देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेद्वारे आरक्षणाची अंमलबजावणी केली आहे. आरक्षण म्हणजे विशिष्ट सवलत राखीव जागांच्या माध्यमातून देणे होय. विकासाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित असणाऱ्या समाजाला इतर प्रभावी समाजाच्या बरोबरीने आणण्यासाठी आरक्षण देण्यात आले आहे. अन्यथा विकासाच्या प्रक्रियेत मागे राहण्याची शक्यता असते. म्हणून अविकसित लोकांना विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून देण्याच्या दृष्टीने आरक्षण हे एक महत्त्वाचे माध्यम आहे. समाजात परिवर्तन घडून आणणे आणि उपेक्षितांना सामाजिक न्याय देण्याच्या दृष्टीने आरक्षण हे अतिशय महत्त्वाचे आहे.

1.3 इतर मागासवर्गीय समाजाकरीता आरक्षण धोरण :

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षणाच्या माध्यमातून बहुजन समाजाची वर्गवारी केली. त्यामध्ये इतर मागासवर्गीय समाज मुख्य आहे. भारतात सत्ता, संपत्ती, शिक्षण या बाबतीत विषमता आहे. ही विषमता आरक्षणाच्या माध्यमातून कमी करता येईल. जे मागासगलेले आहेत त्यांना खास सोईसवलती देऊन पुढे आणण्याची जबाबदारी आरक्षणाच्या माध्यमातून केली आहे. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या समाजाला म्हणजे मागासवर्गीय ओ.बी.सी. यांच्या विकासासाठी भारतीय राज्यघटनेने कलम 15 (4) द्वारे ओ.बी.सी. वर्गाला आरक्षण

देण्याची तरतूद केली. ओ.बी.सी.आरक्षणाच्या संदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी एक मसुदा तयार केला व या मसुद्यानुसार इतर मागासवर्गीय लोक कोण आहेत? हे शोधण्यासाठी आणि त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर उपाय योजना करण्यासाठी भारतीय राज्यघटनेत कलम 340 वे कलम निर्माण केले.

काकासाहेब कालेलकर आयोगाने इतर मागासवर्गीय जातीची ओळख करून त्यांना आरक्षण देण्याचे सुचित केले. इतर मागासवर्गीय जातीसाठी केंद्र सरकारने नेमलेला पहिला आयोग घटनेच्या 340 व्या कलमाद्वारे 29 जानेवारी 1953 रोजी राष्ट्रपतीने वटहुकूम काढून काकासाहेब कालेलकर आयोगाची स्थापना केली. 1990 साली मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार तत्कालीन सरकारने ओ.बी.सी. यांना नोकऱ्यांमध्ये आरक्षण जाहीर केले.

काकासाहेब कालेलकर आयोगाने देशातील 2399 जाती मागास म्हणून ठरविल्या तर 837 जाती सर्वाधिक मागास म्हणून घोषित केल्या. मंडल आयोगाने देखील भारतातील 3766 जातींना मागास म्हणून घोषित केले. मंडल आयोगानुसार ओबीसींना 27% आरक्षण देण्यात आले.

1.4 संशोधन विषयाची निवड/समस्यासुत्रण :

भारतात आरक्षण ही संकल्पना सार्वत्रिक आणि गुंतागुंतीची आहे. आरक्षण प्राप्त लोकांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होत आहे. या बाबींचा विचार करून इतर मागासवर्गीय समाजाच्या आर्थिक विकासात आरक्षणाची भूमिका या विषयाची निवड केली आहे. 1950 नंतर भारताने लोकशाहीवर आधारीत राज्यघटनेचा

स्वीकार केला. राज्यघटना ही सामाजिक न्यायावर आधारीत असल्यामुळे इतर मागासवर्गीय समाजाचा आरक्षणाच्या माध्यमातून आर्थिक विकास होत आहे काय? इतर मागासवर्गीय समाजातील व्यक्ती आरक्षणाचा लाभ घेऊन शिक्षण घेत आहेत काय? इतर मागासवर्गीय व्यक्ती आरक्षणाच्या माध्यमातून शासकीय सेवा करीत आहेत काय? एकंदरीत इतर मागासवर्गीय समाजाच्या आर्थिक विकासात आरक्षणाची भूमिका पाहण्यासाठी सदरील विषयाची निवड संशोधन करण्यासाठी केलेली आहे.

1.5 संशोधन विषयाचे महत्त्व :

इतर मागासवर्गीय समाजाला 27% आरक्षण दिल्यामुळे या समाजाचा विकास होत आहे. काकासाहेब कालेलकर आयोग, मंडल आयोग यांची भूमिका देखील महत्त्वाची आहे. प्रस्तुत संशोधन विषयाचे महत्त्व खालीलप्रमाणे नमूद करता येईल.

1. इतर मागासवर्गीय समाजाचा आर्थिक विकास होत आहे या दृष्टिने महत्त्व अधोरेखित करता येईल.
2. इतर मागासवर्गीय समाजाच्या विकासास आरक्षण कारणीभूत आहे या दृष्टिने महत्त्व सांगता येईल.
3. आरक्षणामुळे इतर मागासवर्गीय समाजातील व्यक्ती उच्च पदावर आहेत या दृष्टिने महत्त्व नमूद करता येईल.

4. आरक्षणामुळे इतर मागासवर्गीय समाज विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये सहभागी झाला आहे असे सांगता येईल.

5. आरक्षणामुळे इतर मागासवर्गीय समाजातील व्यक्तीने उद्योग क्षेत्रात नावलौकिक केला आहे, या संदर्भाने महत्त्व सांगता येईल.

1.6 संशोधनाची उद्दिष्ट्ये :

"नांदेड जिल्ह्यातील इतर मागासवर्गीय समाजाच्या आर्थिक विकासातील आरक्षणाची भूमिका (2011 ते 2021)" प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी विषयाची काही निश्चित अशी उद्दिष्ट्ये केलेली आहेत, ती खालीलप्रमाणे :

1. अभ्यास क्षेत्रातील आर्थिक घटकांचा अभ्यास करणे.

2. आरक्षणाच्या अनुषंगाने इतर मागासवर्गीय समाजाचा आर्थिक विकासाचा अभ्यास करणे.

3. इतर मागासवर्गीय समाजाच्या विकासाकरीता विविध आयोगाने केलेल्या शिफारशींचा अभ्यास करणे.

4. इतर मागासवर्गीय समाजाला आरक्षणाच्या होणाऱ्या लाभाचा अभ्यास करणे.

5. आरक्षणामुळे इतर मागासवर्गीय लोकांचे शासकीय सेवेतील प्रमाणांचा अभ्यास करणे.

1.7 संशोधनाची गृहितके :

1. इतर मागासवर्गीय समाजासाठी आयोगांनी केलेल्या शिफारशी इतर मागासवर्गीयांसाठी महत्त्वाच्या ठरल्या आहेत.

2. इतर मागासवर्गीय समाज आरक्षणाचा लाभ घेतला आहे.

3. आरक्षणामुळे इतर मागासवर्गीय लोकांचे शासकीय सेवेतील प्रमाण वाढले आहे.

4. इतर मागासवर्गीय समाजाचा आरक्षणामुळे आर्थिक विकास झाला आहे.

1.8 संशोधनाचे क्षेत्र :

'अर्थशास्त्र' विषयामध्ये संशोधन करण्यासाठी संशोधन विषयाची निवड केली आहे. विषयाची निवड केल्यानंतर अध्ययन क्षेत्राची निवड करणे गरजेचे असते. या बाबीचा विचार करून अध्ययन क्षेत्राची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याचे प्रमुख पाच विभागात वर्गीकरण केले आहे. त्यामध्ये मराठवाडा हा विभाग आहे. मराठवाड्यामध्ये 8 जिल्ह्यांचा समावेश केला आहे. त्यामध्ये नांदेड जिल्हा मुख्य आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये एकूण 16 तालुके आहेत. म्हणजेच संशोधनासाठी अध्ययन क्षेत्र म्हणून नांदेड जिल्ह्याची निवड केली आहे.

1.9 संशोधनाची मर्यादा :

1. सदरील संशोधन मागासवर्गीय समाजाचे प्रशासकीय सेवेतील प्रतिनिधीत्व यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. ती एक संशोधनाच्या दृष्टिकोनातून मर्यादा ठरेल.

2. प्रस्तुत अध्ययनात इतर मागासवर्गीय समाजाचा विकास अभ्यासताना इतर जातीचा अभ्यास करण्यात येणार नाही, त्यामुळे ती एक प्रमुख मर्यादा म्हणून सांगता येईल.

1.10 संशोधन आराखडा :

प्रस्तुत विषयाचा अभ्यास संशोधन आराखड्याशिवाय करणे अशक्य आहे. संशोधन कृतीला कशाप्रकारे संशोधन करावयाचे आहे. नमुना निवड किती घ्यावयाची आहे, तथ्य संकलन कोणत्या पद्धतीने केली जात आहेत इत्यादी बाबीचे निर्णय संशोधन आराखड्यात नमूद करणे आवश्यक असते. या बाबीचा विचार करून संशोधन आराखड्याची निवड करण्यात आली आहे. संशोधन आराखड्याचे विविध प्रकार आहेत. परंतु संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये लक्षात घेऊन वर्णनात्मक संशोधन आराखड्याची निवड केली आहे. वर्णनात्मक आराखड्याचा मुख्य उद्देश संकलित तथ्यांच्या आधारे अध्ययन विष्याचे वर्णनात्मक स्पष्टीकरण करणे होय. इतर मागासवर्गीय समाजाचा आर्थिक विकास इतर मागासवर्गीय समाजाच्या शासकीय सेवेतील प्रमाण तसेच इतर मागासवर्गीय समाजाचा सर्वच क्षेत्रातील विकास इ. बाबींचा अभ्यास वर्णनात्मकदृष्ट्या करण्याकरीता वर्णनात्मक संशोधन आराखडा महत्त्वाचा ठरणार आहे.

1.11 नमुना निवड :

प्रस्तुत विषयाचा संशोधन आराखडा तयार केला आहे. आराखडा निश्चित केल्यानंतर नमुना निवडावा लागतो. तथ्य संकलनाच्या प्रमुख दोन पद्धती आहेत. जनगणना पद्धती आणि नमुना निवड पद्धती. सदरील विषयाचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठी नमुना निवड ही पद्धत निश्चित केली आहे. अध्ययन क्षेत्रातील एककाची किंवा उत्तरदात्यांची संख्या अधिक असल्यामुळे नमुना निवड ही पद्धत उपयुक्त ठरते. नमुना निवडीचे प्रमुख दोन प्रकार आहेत. संभाव्यता आणि असंभाव्यता नमुना निवड़ असंभाव्यता नमुना निवडीमधील 'सहेतूक किंवा उद्देशपूर्ण नमुना निवडीचा अवलंब केला आहे.' उद्देशपूर्ण नमुना म्हणजे हेतूनुसार संशोधक आपल्या उद्दिष्टांना समोर ठेवून एककाची निवड करतो. यामध्ये संशोधकाला नमुना निवडीचे स्वातंत्र्य असते. सदरील बाबीचा विचार करून अध्ययनासाठी एकूण 320 नमुना निश्चित केला आहे. नांदेड जिल्ह्यात एकूण 16 तालुके आहेत. प्रत्येक तालुक्यातून नमुना 20 घेतला आहे.

1.12 तथ्य संकलन :

"नांदेड जिल्ह्यातील इतर मागासवर्गीय समाजाच्या आर्थिक विकासातील आरक्षणाची भूमिका (2011 ते 2021)" या विषयाचे अध्ययन करण्यासासठी विषयाच्या संदर्भात प्रकाशित आणि अप्रकाशित स्वरुपाची माहिती संकलित करण्यात येणार आहे. तथ्य संकलनाच्या प्रमुख दोन पद्धती आहेत. प्राथमिक तथ्य संकलन आणि द्वितीय तथ्य संकलन.

अ) प्राथमिक स्त्रोत :

प्राथमिक स्त्रोत म्हणजे संशोधक प्रत्यक्ष संशोधन क्षेत्रात जाऊन मुलाखत अनुसूची, प्रश्नावली आणि निरीक्षणाच्या माध्यमातून माहिती संकलित केली जाणार आहे. संशोधन अध्ययन क्षेत्रात जाऊन घटनेचे अध्ययन करणार आहे. प्रस्तुत संशोधनासाठी इतर मागासवर्गीय समाजातील आरक्षणाचा लाभ घेतलेल्या व्यक्तीची आर्थिक परिस्थिती जाणून घेऊन अभ्यास करण्यात येणार आहे.

ब) दुय्यम स्त्रोत :

अर्थशास्त्रीय संशोधनात तथ्य संकलनाचा दुय्यम स्त्रोत महत्त्वाचा आहे. संशोधक प्रत्यक्ष अध्ययन क्षेत्रात जाऊन माहिती संकलित करीत नसतो, तर इतर व्यक्तीने प्रकाशित केलेल्या माहितीचा उपयोग करत असतो. प्रकाशित आणि अप्रकाशित साहित्याचा देखील अवलंब केला जातो. पुस्तक हे संदर्भग्रंथ, सांख्यिकीय माहिती, विविध अहवाल, जनगणना अहवाल, विविध आयोगाचे अहवाल, मासिके, अर्थशास्त्रीय संशोधन पत्रिका, वर्तमानपत्रे, इंटरनेट, शासकीय गॅझेटियर, इतर व्यक्तींनी केलेले संशोधन अहवाल इत्यादी दुय्यम स्त्रोतांचा अवलंब करण्यात येणार आहे.

क) सांख्यिकीय तंत्र :

उपलब्ध माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, टक्केवारी, मध्यमान, सहसंबंध, आलेख, तक्ता सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

ड) संकलित तथ्यांचे विश्लेषण :

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करताना नमुना निवडीच्या माध्यमातून प्राथमिक तंत्राचा अवलंब करून वस्तुनिष्ठ तथ्ये संकलित करावी लागतात. संकलित केलेली तथ्ये अव्यवस्थित असतात त्यांना व्यवस्थित करावी लागतात. संकलित तथ्यांचे विश्लेषण करणे, अतिशय महत्त्वाचे समजले जाते. त्यामुळे विविध सारण्या, आलेखांच्या माध्यमातून विश्लेषण करण्यात आले आहे.

इ) निष्कर्ष आणि सूचना :

तथ्यांचे विश्लेषण सारणी व आलेखांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. तथ्यांच्या विश्लेषणाच्या अभ्यासातून काही निष्कर्ष काढण्यात येणार आहेत. निष्कर्षांचा अभ्यास करून शिफारशी किंवा सूचना देण्यात येणार आहेत.

1.13 प्रकरणांची रूपरेषा :

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रस्तावना स्पष्ट करून विषयाचे महत्त्व, तसेच विषयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, आरक्षण संकल्पना, आरक्षणाचा उगम, आरक्षण संकल्पनेचा विकास, आरक्षण विषयाची फलश्रृती इत्यादी घटकांचे विस्तृत लिखाण करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : संदर्भ साहित्याचा आढावा

संदर्भ साहित्याच्या आढाव्यामध्ये आरक्षणाच्या संदर्भात विविध विचारवंतांनी, अभ्यासकांन, प्राध्यापकांनी, तज्ज्ञांनी संशोधन केलेले आहे. हे

संशोधन पीएच.डी., एम.फिल. या माध्यमातून केले आहे. तसेच अर्थशास्त्र संशोधन पत्रिका, समाज प्रबोधन पत्रिका, परिवर्तनाचा वाटसरू, विविध संशोधन मासिके, वर्तमानपत्र इत्यादीमध्ये प्रकाशित झालेले संशोधनपर लेख यांचा थोडक्यात आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : आरक्षण व इतर मागासवर्गीय समाज

सदरील प्रकरणात आरक्षण व इतर मागासवर्गीय समाज या अनुषंगाने लिखाण करण्यात येणार आहे. आरक्षणामुळे इतर मागासवर्गीय समाजाच्या एकंदरीत विकासाच्या प्रक्रियेवर प्रकाश टाकण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : इतर मागासवर्गीय समाज व विविध आयोग

भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून इतर मागासवर्गीय समाजाला आरक्षण देण्यात आले आहे. इतर मागासवर्गीय समाजाचा एक प्रवर्ग तयार केला आहे. तसेच इतर मागासवर्गीय समाजाच्या संदर्भात काकासाहेब कालेलकर, मंडल आयोग आदी आयोगांच्या अनुषंगाने लिखाण करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : इतर मागासवर्गीय समाज आयोगाच्या शिफारशी व अंमलबजावणी.

इतर मागासवर्गीय समाजाच्या विकासाच्या संदर्भात विविध आयोगांनी शिफारशी केलेल्या आहेत. त्या शिफारशींची योग्य तऱ्हेने अंमलबजावणी केली आहे. या संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे : आरक्षण व इतर मागासवर्गीय समाजाचा आर्थिक विकास

संशोधनाच्या सहाव्या प्रकरणामध्ये आरक्षणामुळे इतर मागासवर्गीय समाजाचा आर्थिक विकास होत आहे. या विकासावर विश्लेषणात्मक पद्धतीने लिखाण करण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे : निष्कर्ष व शिफारशी

संशोधन विषयाच्या अनुषंगाने अभ्यास केल्यानंतर प्रमुख निष्कर्ष व शिफारशी सुचविण्यात येणार आहेत.

संदर्भसूची :-

1. घांगरेकर चिं.ग.(2002), "भारतीय राज्यघटना : स्वरूप आणि राजकारण", नागपूर, मंगेश प्रकाशन, दुसरी आवृत्ती.

2. गायकवाड प्रवीण (ऑक्टोबर 2013), "आरक्षण", पुणे, जिजाई प्रकाशन, प्रथम आवृत्ती.

3. कांबळे नारायण आणि इतर (संपा.) (ऑगस्ट 2008), “आरक्षण : सत्य आणि विपर्यास”, औरंगाबाद, चिन्मय प्रकाशन.

4. शेलकर अभया (2020), “आरक्षण”, औरंगाबाद, नाशिक लॉ हाऊस प्रकाशन.

5. देशमुख रा.नी. (2014), “आपला नांदेड जिल्हा”, नांदेड, कल्पना प्रकाशन.

6. करे बिभीषण (जुलै 2015), “सामाजिक संशोधनाची मूलतत्त्वे”, औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती.

7. सावंत डि.भी., सरोदे रवी (ऑक्टोबर 2021), “संशोधन पद्धती”, पुणे, इगल लिप प्रकाशन.

8. आगलावे प्रदीप (जानेवारी 2010), “संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे”, नागपूर, विद्या प्रकाशन, द्वितीय आवृत्ती.

9. मिश्रा महेंद्रकुमार (2009), “भारतीय संविधान में आरक्षण एवं राजनिती”, जयपूर, राज पब्लिशिंग हाऊस.

10. ढगे एस.के. (जुलै 2013), “भारतीय अर्थव्यवस्था”, पुणे, के.एस.पब्लिकेशन.

11. जंगले मंगला (2013), “महाराष्ट्राची अर्थव्यवस्था”, जळगाव, प्रशांत पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती

12. महाजन संजय, दीक्षित अजय (डिसेंबर 2013), “ग्रामीण विकासाचे आयाम”, परभणी, राजवीर पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती.

13. सावळे संजय, “भारतीय खेडी : अर्थ व राजकारण”, नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,

14. दैनिक सकाळ

15. दैनिक महाराष्ट्र टाईम्स

16. दैनिक लोकसत्ता

17. दैनिक लोकमत

18. Jean Dieze, Amrtya Sen, “India : Economic Development and Social Opportunity”, Oxford University Press, New Delhi, 1995.

19. Ghuge V. B., (1994); “Rajarshi Shahu : A Model Ruler”, Kitti Prakashan, Aurangabad.

20. Kannabiran Kalpana, “Road Map for reservation in higher education”, The Hindu, 18.04.2008.

21. Thorat Sukhdev and Others; “Reservation and Private Sector Quest for equal opportunity and growth”, Indian Institute of Dalit Studies and Rawat Publications, New Delhi.

22. https://hi.m.wikipedi.org

23. https://bccomm.mp.gov.in

24. https://mazagaon.gov.in

मार्गदर्शक

संशोधक
सोनकांबळे जुही धोंडीबा
सामाजिकशास्त्रे संकुल
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड